# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

## (पोलीस वार्तापत्र)

## सायंकाळ

दिनांक 15.09.2020 मंगळवार

(गुन्हे)

**1) पो.स्टे. बेलतरोडी – अपत्य जन्माची लपवणुक करून विल्हेवाट लावणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दिनांक 15.09.2020 चे 1200 वा चे सुमारास फिर्यादी रानु संतोष मढेल, वय 33 वर्ष, रा. गणेशपेठ व्यायाम शाळा रॉयल सुट समोर, गणेशपेठ, नागपुर हे पो.स्टे बेलतरोडी हद्दीत कैकाडे नगर झोपडपट्टी येथील चिंतामन शाहु यांचे घरामागील गटरचे चेंबर क्रं. 3 चोक झाल्याने त्याची साफसफाई करीत असतांना एक अभ्रक पाण्यात तरंगतांना दिसुन आले. त्यास कोणीतरी अज्ञात आरोपीने त्याचे जन्माची लपवणुक करण्याकरीता फेकुण दिले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोस्टे बेलतरोडी येथे पोहवा संजय हुड, 9823364082 यांनी आरोपीविरूध्द कलम 318 भादवि अन्वये गुन्हा नोदविला आहे.

**2) पो.स्टे नंदनवन – पळवुन नेणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दिनांक 13.09.2020 चे 1400 वा चे सुमारास पो.स्टे नंदनवन हद्दीत राहणा–या फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी ही दुकानात जावुन येते असे सांगुण निघुन गेली. परत आली नाही शोध घेतला असता मिळुण आली नाही. तिला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार पो.स्टे नंदनवन येथे सपोनि देवकर, 9503635300 यांनी कलम 363 भादवि अन्वये गुन्हा नोदविला आहे.

**3) पो.स्टे इमामवाडा – गैरकायद्याची मंडळी जमवणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दिनांक 14.09.2020 चे 2000 वा चे सुमारास पो.स्टे. इमामवाडा हद्दीत रामबाग, मिलींद बौध्द विहार जवळ, नागपूर येथे राहणारा फिर्यादी पलाश उर्फ गन्नी प्रकाश वासनिक, वय 25 वर्ष, हा घरी आपल्या अंगणात उभा असतांना आरोपी क्र. 1) भिक्कु उर्फ राजु रामभाउ परचाके, वय 40 वर्ष, रा. रामबाग, नागपूर, याचे सोबत झालेल्या जुन्या वादाचे कारणावरून 2) अजय पाहुणे, वय 45 वर्ष, रा. इमामवाडा, नागपूर, 3) धिरज अविनाश मंडपे, वय 40 वर्ष, रा. जयंती मैदान, रामबाग, नागपूर, 4) अजिंक्य नावाचा इसम व त्यांचे 25 ते 30 वर्ष वयोगटातील इतर साथीदार हे हातामध्ये लाठयाकाठया व लोखंडी शस्त्र घेवून येतांना फिर्यादीस दिसले फिर्यादी हा त्यांना घाबरून घरा जवळील बिल्डींग चे छतावर जाउन पाहत असता आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून हत्यारासह फिर्यादीचे घरा समोर येवून पलाश तु घर के बाहर निकल असे म्हणुन फिर्यादीचे घरचे लोकांनी दार बंद केल्याने आरोपींनी घराला लाथा मारून धमकी देवून निघुन गेले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. इमामवाडा येथे पोउपनि बी.डी. पवार, 9527983907 यांनी आरोपीविरूध्द कलम 452,143,144,147,148,149 भादंवि सहकलम 4,25 भाहका सहकलम 135,142 मपोका अन्वये गुन्हा नोंदवून आरोपी क्र. 1 यास अटक केली आहे.

(अकस्मात मृत्यू)

**पो.स्टे. पारडी, नविन कामठी, मानकापुर, नंदनवन, अजनी, एमआयडीसी, पाचपावली, इमामवाडा :**

1) पारडी – दिनांक 14.09.2020 चे 2200 वा चे सुमारास पो.स्टे पारडी हद्दीत प्लॉट नं. 49 भवानी मंदीर जवळ, पारडी नागपुर येथे राहणा–या सौ. शिला शिवचंद हीरापुरे, वय 43 वर्ष यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत

घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे पारडी येथे मपोउपनि गोदमले, 9284126521 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

2) नविन कामठी – दिनांक 14.09.2020 चे 0900 वा पुर्वी महादेव नत्थुजी मोडे वय 70 वर्ष, रा. कन्हान वार्ड क्रं. 4 अशोकनगर, नागपुर हे पो.स्टे नविन कामठी हद्यीत रेल्वे स्टेशन जी.आर.पी स्टेशनचे मागे मृत अवस्थेत मिळुण आले. याप्रकरणी फिर्यादी अशोक पोकीलाल गौर,वय 45 वर्ष, स्टेशन प्रबंधक यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे नविन कामठी येथे सपोउपनि आसटकर, 8657986638 यांनी अकस्मात मृत्युची नोद केली आहे.

3) नविन कामठी – दिनांक 15.09.2020 चे 1400 वा पुर्वी अंदाजे 70 वर्ष वयोगटातील एक अनोळखी पुरूष इसम हे पो.स्टे नविन कामठी हद्यीत रेल्वे स्टेशन गेट समोर मृत अवस्थेत मिळुण आले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे नविन कामठी येथे सपोउपनि आसटकर, 8657986638 यांनी अकस्मात मृत्युची नोद केली आहे.

4) मानकापुर – दिनांक 15.09.2020 चे 1400 वा चे सुमारास पो.स्टे मानकापुर हद्यीत प्रादेशीक मनोरूग्नालय नागपुर येथे अनोळखी पुरूष इसम सोहन चंदु वय 81 वर्ष हे उपचार घेत असतांना मरण पावले. याप्रकरणी फिर्यादी डॉक्टर ढेंगरे, प्रादेशिक मनोरूग्नालय नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे मानकापुर येथे मपोउपनि शेंडे, 7276442395 यांनी अकस्मात मृत्युची नोद केली आहे.

5) नंदनवन – दिनांक 14.09.2020 चे 1500 वा चे सुमारास पो.स्टे नंदनवन हद्यीत प्लॉट नं. 5 रमना मारोती नगर डायमंड नगर बोर्ड जवळ नागपुर येथे राहणारे मनोज शिवाजी दंधे, वय 70 वर्ष यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 15.09.2020 चे 0035 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे नंदनवन येथे सपोनि आर.आर राउत, 9503527855 यांनी अकस्मात मृत्युची नोद केलीं आहे.

6) अजनी – दिनांक 14.09.2020 चे 2018 वा चे सुमारास पो.स्टे अजनी हद्यीत चंद्रमणी नगर, ब्लु स्टोन अपार्टमेंट, फ्लॅट नं. 102 रामेश्वरी नागपुर येथे राहणारे मंसाराम श्रीहरी भुसाळकर, वय 68 वर्ष, यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे अजनी सपोउपनि कोरपे, 9923593308 यांनी अकस्मात मृत्युची नोद केलीं आहे.

7) अजनी – दिनांक 13.09.2020 चे 0900 वा चे सुमारास पो.स्टे अजनी हद्यीत प्लॉट नं. 21 विनकर वसाहत, मानेवाडा रोड, नागपुर येथे राहणारा मयुर अनिल छप्परधरे, वय 20 वर्ष, हा आपल्या राहते घरी बाथरूम मध्ये चक्कर येवुन पडल्याने त्यास उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे अजनी येथे मपोउपनि एस. आर सोमनकर, 9158948350 यांनी अकस्मात मृत्युची नोद केलीं आहे.

8) एमआयडीसी – दिनांक 14.09.2020 चे 1900 वा चे सुमारास पो.स्टे एमआयडीसी हद्यीत राजीव नगर हिंगणा रोड, नागपुर येथे राहणारे सुनिल कहार, वय 45 वर्ष, यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता लता मंगेशकर हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 15.09.2020 चे 0230 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी फिर्यादी सुरेश भाउरावजी ठाकरे, वय 35 वर्ष, रा. भिमनगर नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे एमआयडीसी येथे पोउपनि मदनकर, 8788934349 यांनी अकस्मात मृत्युची नोद केली आहे.

9) पाचपावली – दिनांक 14.09.2020 चे 2030 वा चे सुमारास अंदाजे 45 वर्ष वयोगटातील एक अनोळखी पुरूष इसम हा पो.स्टे पाचपावली हद्यीत इंदोरा पोलीस क्वॉटर जवळ बॉम्बे क्लॉथ स्टोर्स सेल दुकानाजवळ बेशुध्द अवस्थेत मिळुण आला. त्याला 108 क्रमांची ॲम्बुलंसचे डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे पाचपावली येथे पोहवा राम पायतोडे, 9130005723 यांनी अकस्मात मृत्युची नोद केली आहे.

10) इमामवाडा – दिनांक 12.09.2020 चे 1958 वा चे सुमारास पो.स्टे इमामवाडा हद्यीत प्लॉट नं. 51 अ, जाटतरोडी क्रं. 2, कार्पोरेशन शाळेजवळ राहणारे गेंदलाल कालूराम गुजर, वय 66 वर्ष, यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादम्यान दिनांक 15.09.2020 चे 0630 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे इमामवाडा येथे पोउपनि सुर्यवंशी 7620823551 यांनी अकस्मात मृत्युची नोद केली आहे.

(ईतर)

1) नागपुर शहर पोलीसांकडुन विना मास्क फिरणा–या नागरीकांवर कारवाई :

नागपुर शहरात कोराना विषाणुचा प्रादुर्भाव व प्रसार झपाटयाने वाढल्याने त्यास प्रतिबंध करण्याकरीता मा. पोलीस आयुक्त, श्री अमितेश कुमार, यांचे मार्गदर्शनाखाली नागपुर शहरातील सर्व पोलीस स्टेशन व वाहतुक शाखेमार्फत आज विना मास्क फिरणा–या व्यक्तींवर तसेच वाहतुकीच्या इतर कलमान्वये कारवाई करण्यात आली.

सदर करण्यात आलेली कारवाई ही एका दिवसातील सर्वोच्च अशी कारवाई आहे. तरी सर्व नागपुरकर नागरींकाना आवाहन करण्यात येते की सार्वजनीक ठिकाणी वाहतुक करतांना किंवा वावरतांना तोंडाला मास्क लावावा, सॅनिटायझरचा वापर करावा तसेच सुरक्षित सामाजिक अंतर ठेवावे व नागपुर पोलीसांना सहकार्य करून स्वतःवर होणारी कारवाई टाळावी. (सदरची कारवाई सायंकाळी 0600 वा पर्यंत ची आहे)

| | केसेस | दंड |
|---|---|---|
| पोलीस स्टेशन | 451 | 1,46,500 |
| वाहतुक विभाग | 162 | 81,000 |
| एकुण | 613 | 2,27,500 |

2) शहरातील नाईट राऊंड अधिकारी बाबत :–

नागपूर शहरात आज दिनांक 15.09.2020 रोजी मा. पोलीस उप आयुक्त, (परि.क्रं. 1) श्री. विवेक मासाळ, हे नाईट राऊंड करणार आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर